SEAL OF THE SUB REGISTRAR
यवल
दस्त क्र. २६४ /२०२२
१ / ५

# भाडेपट्टा

मौजे: तांदुळवाडी, ता. येवला, जि.नाशिक येथील जमिनीचे
दिनांक:१९/०१/२०२२ इ.स.चे
भाडेकराराची मुदत:- २९ वर्षे
मसिक भाडे रू. ५०००/-

| | |
|---|---|
| BHULAXMI FARMER PRODUCER COMPANY LIMITED तर्फे<br>संचालक – श्री. नंदकिशोर श्रीराम शिंदे<br>CIN NO. U01100MH2017PTC291334<br>आधार नं. ८७९८ ४२६५ ८६३८<br>वय वर्ष ४२, व्यवसाय – डॉक्टर व शेती<br>पत्ता – रा. तांदुळवाडी<br>ता. येवला, जि.नाशिक ४२३४०१ | पार्टी नंबर १<br>लिहून घेणार<br>(भाडेकरू) |
| यांसी......... | |
| पुंजाबाई श्रीराम शिंदे<br>वय वर्षे 62 , धंदा - शेती<br>पत्ता – रा. तांदुळवाडी<br>ता. येवला, जि.नाशिक ४२३४०१ | पार्टी नंबर २<br>लिहून देणार<br>( जागा मालक) |

यातील लिहून देणार (पार्टी नंबर २) लिहून देतात भाडेपट्टा असे की,

१. **मिळकतीचे वर्णन** - 'तुकडी व जिल्हा परिषद नाशिक पोट तुकडी व पंचायत समिती येवला मधील ग्रामपंचायत **तांदुळवाडी**, ता. येवला गांव मौजे **तांदुळवाडी** ,ता. येवला जि. नाशिक या गावच्या हद्दीतील माझे मालकी वहिवाटीची माझे नांवे ७/१२ व ८अ ला नोंद असलेली जमीन भाडेकरारराने २९ वर्षे मुदतीने भुलक्ष्मी फार्मर प्रोड्युसर कंपनी लि. शेती व शेतीवर आधारित अन्न प्रकिया उद्योगासाठी २९ वर्षे शेतजमीन भाडे तत्वावर ताब्यात दिलेली आहे.

यलअ ३
दस्त क्र. - २८४ /२०२२
२/५०

जमीन भाडेकाररराने २९ वर्षे मुदतीने भुलक्ष्मी फार्मर प्रोड्युसर कंपनी लि. शेती व शेतीवर आधारित अन्न प्रक्रिया उद्योगासाठी २९ वर्षे शेतजमीन भाडे तत्वावर ताब्यात दिलेली आहे.

| भाडेपट्टेने दिलेले क्षेत्र | गट नंबर [सर्व्हेनंबर] | क्षेत्र [हे.आर] | आकार [रु.पै.] |
|---|---|---|---|
| | ३०/२ पै. | ०२-२२ पो.ख. ०९ | ०१-८५ |
| यापैकी माझे मालकीची व हिस्से कब्जे वहिवाटीचे तुम्हास या लेखाने २९ वर्ष भाडेपट्टेने पूर्व पश्चिमं दक्षिणेकडील क्षेत्र | | ००-४० | ००-०८ |

वहिवाट – सर्व तदगभुत वस्तु वहिवाटी हक्कासह व जाणे येणेच्या वहिवाटी हक्कासह यांसी चतुर्सिमा खालील प्रमाणे :-

| पुर्व | पश्चिम | दक्षिण | उत्तर |
|---|---|---|---|
| गट नं. ३१ | रस्ता | गट नं. ७० | उर्वरित मिळकत |

येणे प्रमाणे चतु:सिमेच्या आतील आमचे पुर्ण हिस्साची ही जमीन

२. सदर भाडे करार २९ वर्षे म्हणजेच दि. १९/०१/२०२२ पासून दि. १९/०१/२०५१ पर्यंत मुदतीने भाडेने दिलेली आहे.

भुलक्ष्मी फार्मर प्रोड्युसर कंपनी, गव्हर्नमेंट ऑफ इंडिया मिनिस्ट्री ऑफ कॉरपोरेट अफेयर्स मध्ये नोंदणीकृत आहे. (रजि. क्र (U01100MH2017PTC291334) औद्योगिक दृष्ट्या मागास असलेल्या येवला तालुक्यामध्ये शेतक-यांच्या शेती उत्पादनाद्वारे आर्थिक विकास करणयाच्या अनुषंगाने 477 शेतकरी सभासदानी या कंपनीची स्थापना केली आहे. कंपनीचा उद्देश शेती व शेतीवर आधारित प्रक्रिया युनिट व शेती उत्पादने अनुषंगाने शेतकर्यांना अवजारे

३. भाडे तत्वाने देणे / अन्न धान्य व प्रक्रिया माल साठवणूक गोदाम व उत्पादन वाढीसाठी सेवा, मार्गदर्षन केंद्र व शेती पीक उत्पादन घेणे हा आहे.

४. सदर करार कंपनीस कंपनीच्या भाडेकरारातील मुद्दा क्र .२ साठीच आहे. इतर कोणताही वापर करायचा नाही नसून कंपनीने स्वतः न वापरल्यास व करार नाम्यातील अटी व शर्तीचे पालन न झाल्यास सदरचा करार रद्द करण्यात येईल

संस्था सुक्ष्म, लघु, व मध्याम व अन्य प्रकिया बाबतच्या उद्योग शेती व कृषी निगडीत असलेने होणार आहे. ते आम्हाला महाराष्ट्र शासनाचा शासन निर्णय क्रकुराधो - १४१७/प्र.क्र.१०९/९-अे दिनांक: ०६ जुन, २०१८ ने अकृषक परवानगीची अट शिथिल केलेली आहे. वरील शासन निर्णयानुसार अन्नप्रक्रिया उद्योग व शेती कामा व्यतिरिक्त अन्य

दस्त क्र. २८४ /
३/५०

५. औद्योगीय कामासाठी वापर करणार नसल्याची आम्ही आपणास हमी देत. त्याप्रमाणे पार्टी नंबर १ यांचे संस्थेचा उद्योग शेती उत्पादन अनुषंगाने येणारा उद्योग असून जमीनीचा वापर शेती प्रयोजनासाठी केला जाणार आहे म्हणून राज्याच्या अन्य प्रकिया धोरणानुसार २० हेक्टर क्षेत्र मर्यादेपर्यंत जमीनीचा क्षेत्र मर्यादा पर्यंत जमीनीची बिगरशेती वापरासाठी बिगरशेती परवाणगीची आवश्कता राहणार नाही. त्यामुळे भाडेकराराने घेतलेल्या जमीनीचे मुल्यांकन शेतीनुसारच केलेले आहे. त्यानुसार मुद्रांक फी व नोंदणी फी भरलेली आहे

६. मे. सह. जिल्हा निबंधक वर्ग – १ [उ.श्रे.] सो. तथा मुद्रांक जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांचेकडील पत्र जा. क्र. अभि.प्र.क्र. ५६/२०२१/७५१४ अन्वये मुद्रांक माफी करिता सोबत झेरॉक्स जोडली आहे.

७. सदर भाडे कराराने दिलेली जमीन आज रोजी पार्टी नंबर १ यांचे ताब्यात दिलेली आहे. २९ वर्षे मुदतीने कब्जात भाडेने दिलेली आहे.

या जमीनीचे मासिक ५०००/ - या प्रमाणे एकुण २९ वर्षांचे एकुण भाडे रू १७४०,०००/- (अक्षरी सतरा लाख चाळीस हजार रूपये) ठरलेले आहे.

८. सदर रक्कम यातील पार्टी नंबर १ यांनी पार्टी २ यांना दर महिन्याचे १० तारखेच्या आत देणेची आहे.

९. सदर जमीन मिळकतीमध्ये शेतीपुरक व्यवसाय करण्यास यातील पार्टी नंबर २ याची कोणत्याही प्रकारची हरकत असणार नाही. त्यासाठी लागणा-या परवानग्या ह्या पार्टी नंबर १ यांनी काढणेची आहे.

१०. सदर जमीन मिळकतीमध्ये शेती व पशुसंवर्धन, व दुग्धव्यवसायासाठी वा इतर शेतीवर आधारीत व्यवसाय सोडून इतर व्यवसाय करणेची नाही.

११. सदर जमीनीच्या शेजारी असणारे सहहिस्सेदार शेतकरी यांना कोणत्याही प्रकारचा त्रास वा नुकसान करणेची नाही.

१२. सदर शेतजमीनीत दगड, मुरूम, माती, किंवा इ. खनिजे काढणेची नाहीअथवा अवैध उत्खनन करणेची नाही. पार्टी नंबर २ यांच्या पुर्वपरवानगी जमीनीमध्ये फेरबद्दल करणेची नाही.

१३. जमीनीमध्ये पार्टी नंबर १ भाडेकरू यांचे काणेतेही नावाची नोंद करणेची नाही अथवा कुळ हक्क दाखवणेचा नाही अथवा काही हक्क संबंध राहणार नाही.

१४. भाडेकरार ची मुदत संपलेनंतर पार्टी,नंबर १ यांनी पुन्हा भाडेकरारपत्राची मुदत वाढविणेस पार्टी नंबर २ यांची हारकत असणार नाही. जर भाडेकराराची मुदत वाढविणेस यातील पार्टी नंबर १ किंवा २ आपआपसात सहमत नसतील तर पार्टी नंबर १ यांनी जमिनीचा ताबा लिहून घेणार यांना सोडणेंचा आहे.

सदर जमीनीमध्ये पोट कुळ ठेवणेसाठी व इतराना परस्पर भाडेकराराने देणे नाही. सदर जमीन मिळकत आमचे मालकी वहिवाटीची असून त्यावर कोणताही बोजा नाही व कोणासही भाडेकरार अथवा कोणत्याही कराराने दिलेली नाही. व भाडेकराराची मुदत असे पर्यंत कोठेही

१५. गुंतविणार नाही व कोणतेही कर्ज घेणार नाही वा बोजा चढवणार नाही. व कोणासही खरेदी करार किंवा बक्षीस देणार नाही. याची मी हमी दिलेली आहे. याची सर्व माझी व माझे वारसाची जबाबदारी राहील.

१६. वरील मिळकती मधील व्यवसाय करीता लागणारे सर्व परवाने व इतर शासकीय निमशासकीय परवाने घेणेस पार्टी नंबर २ यांची कोणत्याही काही हरकत नाही. सदर परवानग्यासाठी लिहून देणार यांनी आवश्यक त्या लेखी सहया संम्मती विनामोबदला देण्याच्या आहेत. सदरचा करार पत्र लिहून घेणार व लिहून देणार यानी पुन्नर्विचार विचार करून केलेला आहे. यातील मजकुराचे उल्लंघन केल्यास कायदेशीर कारवाईस पात्र राहील. म्हणून लिहून दिले असे.

भाडे करार पत्र

लिहून देणार (पार्टी नंबर २)



[पुंजाबाई श्रीराम शिंदे]

लिहून घेणार ( पार्टी नंबर १)



भुलक्ष्मी फार्मर प्रोड्युसर कंपनी लि.
तर्फे संचालक श्री नंदकिशोर श्रीराम शिंदे

## साक्षिदार

१..................................... २.....................................

नाव – रेखा नंदकिशोर शिंदे
पत्ता – रा. तांदुळवाडी
ता. येवला जि. नाशिक





नाव – दीपक भिमाजी उंडे
पत्ता – रा. येवला
ता. येवला जि. नाशिक



